या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | सोमवार १० जून २०२४ | अंक१८३ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी
नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
94036 41482

# नरेंद्र मोदींनी घेतली तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ; मोदींनंतर महाराष्ट्रातील नेत्याने शपथ घेतली

## महाराष्ट्रातील बडे नेते नितीन गडकरी यांनी चौथ्या क्रमांकावर मंत्रिपदाची शपथ घेतली.

नितीन गडकरी हे तीनवेळा नागपूरमधून निवडून आलेले आहेत. 2014, 2019 या मोदी सरकारमध्ये मंत्री होते. गडकरी हे भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष देखील राहिलेले आहेत. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रिपद नितीन गडकरी यांनी सांभाळलेलं आहे. 'रोडकरी' अशी नितीन गडकरी यांची ओळख आहे. देशातील रस्त्यांचं जाळ विस्तारण्यात नितीन गडकरी यांचा मोठा वाटा राहिला आहे. बई-पुणे द्रुतगती महामार्गासह अनेक नवीन रस्ते नितीन गडकरी यांच्या मंत्रिपदाच्या काळात झालेले आहेत.



नरेंद्र मोदी यांनी आज तिसऱ्यांदा देशाचे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली आहे.सर्वात आधी नरेंद्र मोदी पंतप्रधानपदाची शपथ घेतली. त्यांच्यानंतर राजनाथ सिंह यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. तर तिसऱ्या क्रमांकावर अमित शाह यांनी शपथ घेतली. महाराष्ट्रातील बडे नेते नितीन गडकरी यांनी चौथ्या क्रमांकावर मंत्रिपदाची शपथ घेतली. जगातील सर्वात मोठ्या लोकशाही देशातील सर्वात मोठा सोहळा पार पडतो आहे. या कार्यक्रमाकडे जगाचं लक्ष आहे. या कार्यक्रमाला 7000 लोकांना निमंत्रण देण्यात आलं आहे. जगभरातील दिग्गज लोक उपस्थित आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मंत्र्यांच्या शपथ विधी सुरू होताच नितीन गडकरींच्या नागपुरात जल्लोष केला गेला. चौकात मोठा स्क्रीन लावून शपथविधी कार्यक्रम पहिला जात आहे. कार्यकर्त्यांनी ठिकठिकाणी गर्दी केलीय. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शपथविधीच्या निमित्ताने ठिकठिकाणी भाजपकडून जल्लोष केला जात आहे. रत्नागिरीत ढोल ताशांच्या गजरात आनंदोत्सव साजरा होतोय. नरेंद्र मोदी यांचा शपथविधी पाहण्यासाठी शहरातील मारुती मंदिर परिसरात एलईडी स्क्रीन लावण्यात आल्या आहेत. मोठ्या संख्येने रत्नागिरी जिल्ह्यातील भाजप पदाधिकारी जल्लोषात सामील झाले आहेत.

## अल्तमश शेखचे नीट परीक्षेत सुयश

**प्रतिनिधी/गेवराई**

(शहागड) येथील प्रसिद्ध सोहेल हॉस्पिटलचे संचालक डॉ.चांद शेख यांचे कनिष्ठ चिरंजीव तथा गेवराई येथील प्रसिद्ध गेवराई हॉस्पिटलचे संचालक डॉ.सोहेल शेख यांचे कनिष्ठ बंधू अल्तमश शेख याने चालू वर्षी (सन २०२४ मध्ये) झालेल्या वैद्यकीय प्रवेश पूर्व NEET परीक्षेत ७२० पैकी ६१६ गुण प्राप्त करून यश मिळवल्याबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. अल्तमश शेख यांचे प्राथमिक शिक्षण वाळकेश्वर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत, माध्यमिक शिक्षण शहागडच्या जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत झाले असून उच्च माध्यमिक शिक्षण जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय रामपुरी तालुका गेवराई येथे झाले आहे. त्यानंतर त्यांनी लातूर येथील शाहू कॉलेजमध्ये पुढील शिक्षण घेतले. या यशाबद्दल लोकशाही पत्रकार संघाचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष तथा शासकीय कंत्राटदार अय्युब खान पठाण यांनी अल्तमश शेख यांचे अभिनंदन केले आहे.



## सोयगाव तालुक्यात मृगाच्या पावसाची तिसऱ्या दिवशीही हुलकावणी-खरीपाच्या पेरण्या खोळंबल्या

**छ. संभाजीनगर/प्रतिनिधी**

मृग नक्षत्रात सोयगाव सह तालुक्यात अद्यापही पाऊस न झाल्याने मृगाच्या पावसाने सलग तिसऱ्या दिवशीही रविवारी हुलकावणी दिली आहे त्यामुळे खरिपाच्या पेरण्या खोळंबल्या आहे मागील वर्षीच्या दुष्काळाच्या झळा अद्यापही कायम असून यंदाही पाऊस हुलकावणी देत असल्याचे चित्र आहे त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे

सोयगाव तालुक्यात ४२ हजार ३४३ हेक्टर खरिपाच्या पेरण्याची शेतकऱ्यांनी पूर्वतयारी केली आहे (ता .०७) दुपारी तीन वाजता मृग नक्षत्र सुरू झाले आहे परंतु सोयगाव तालुक्यात मृगाच्या पाऊस झालेला



नसल्याने शेतकऱ्यांची धाकधूक वाढली आहे महागड्या बी बियाणे खते खरेदी करून घेतली आहे परंतु पाऊस च होत नसल्याने पेरण्या करण्याची हिंमत होत नाही दरम्यान मृगाच्या तिसऱ्या दिवशीही हुलकावणी दिली असून मागील वर्षीच्या (जून ता.०९) पर्यंत सोयगाव तालुक्यात सरासरी ७० मी मी पावसाची नोंद झाली होती यंदाच्या वर्षीच्या रविवार (ता.०९) पर्यंत केवळ सहा मी मी अत्यल्प पावसाची नोंद आहे ---वातावरण येते अन निघून जाते सोयगाव तालुक्यात पावसाचे ढग दाटून येतात वातावरण ही तयार होते पण पावसाचे तयार झालेलं वातावरण अचानक निवळून जाते ही निसर्गाची स्थिती सोयगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना विचार करायला लावणारी आहे रोहिणी नक्षत्रात झालेल्या किरकोळ पावसा नंतर रोहिण्याही कोरड्या गेल्या आहे व मृगाच्या पावसानं तिसऱ्या दिवसही रविवारी सायंकाळी वातावरण तयार करून हुलकावणी दिली आहे....

## मनोज जरांगे पाटील यांच्याबद्दल अक्षेपाहार्य वक्तव्य केल्याप्रकरणी कार्यवाही करावी मराठा समाजाच्या वतीने पोलीस अधिक्षकांना निवेदन

**बीड/प्रतिनिधी:** शिरूरमध्ये दशरथ वनवे, दशरथ खेडकर आणि सुरेश उगलमुगले, रामराव खेडकर यांनी मराठा समाज आणि मनोज जरांगे पाटील यांच्याबद्दल अक्षेपाहार्य वक्तव्य केल्याप्रकरणी कार्यवाही करावी, या मागणीसाठी मराठा समाज रविवारी बीडमध्ये रस्त्यावर उतरला. यानंतर समाजाच्या वतीने पोलीस अधिक्षकांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे, वंजारी समाजातील दशरथ वनवे (माजी जि.प.सदस्य), सुरेश उगलमुगले, रामराव खेडकर, रामदास बडे, रोहिदास पाटील (इतर समाज) व इतर प्रमुख १५ ते २० लोकांनी प्रक्षोभक भाषणे करून व तेथे जमलेल्या ३००० ते ४,००० वंजारी समाजाच्या लोकांनी, समान उद्देशाने जाणिवपुर्वक एकत्र जमून, जाणिवपुर्वक प्रक्षोभक भाषणे



करून तसेच प्रक्षोभक भाषणे केल्याने दोन समाजामधे जातीय तेढ निर्माण होऊन व कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, हे माहिती असताना देखील सर्व लोकांनी व जमावाने सक्रिय सहभाग नोंदवून, मराठा समाजा बद्दल व मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्याबद्दल खालच्या थराची भाषा वापरून मराठा समाजाबद्दल द्वेष पसरवून व असंतोष निर्माण केल्यामुळे त्यांचे विरूद्ध योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.या वेळी सकळ मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दिनांक 11 जून 2024 रोजी ची बीड जिल्हा बंदची हाक रद्द करण्यात आलेली आहे.

सकल मराठा समाज बीड जिल्हा *दिनांक 11 जून 2024 रोजी मंगळवार सकल मराठा समाज बीड जिल्ह्याच्या वतीने बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आलेली होती. सध्याचे पावसाळ्याचे दिवस लक्षात घेता शेतकऱ्यांच्या पीक पेरणीचे दिवस लक्षात घेता आणि मराठा योद्धा माननीय मनोज जरांगे पाटील यांच्या सूचनेवरून दिनांक 11 जून 2024 मंगळवार रोजी च्या बीड जिल्हा बंदची हाक मागे घेण्यात आली असून, बीड जिल्हा सकल मराठा समाजाच्या वतीने सर्व व्यापारी बांधव आणि सर्व समाज बांधव आणि बीड जिल्ह्यातील वासियांना विनंती करण्यात येत आहे की दिनांक 11 जून 2024 मंगळवार रोजी चा बीड जिल्हा बंदची हाक परत घेण्यात आलेली असून बीड जिल्हा बंद ठेवण्यात येणार नाही.

## कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडून शेतकऱ्यांसाठी कृषी तक्रार व्हाट्सअप नंबर जारी !

**ऊंबाजोगाई/प्रतिनिधी**

कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी एक दिवस आधी राज्याच्या खरीप हंगामाच्या नियोजनाचा आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी शेतकऱ्यांसाठी 'कृषी तक्रार व्हाट्सप हेल्पलाईन क्रमांक' जारी करण्याचे निर्देश दिले, त्याप्रमाणे कृषी विभागाकडून ९८२२४४६६५५ हा व्हाट्सप क्रमांक जारी करण्यात आला आहे. राज्यात कुठेही कृषी निविष्ठा विक्रेते शेतकऱ्यांना विविष्ट कंपनीचे बियाणे किंवा खत घेण्याची सक्ती करत असतील, बी- बियाणे, खते किंवा कीटक नाशकांची चढ्या भावाने विक्री करत असतील, अनावश्यक वस्तू खरेदी करण्याची सक्ती करत असतील, एखादे बोगस वाण विक्री करत असतील, किंवा अशा काही तक्रारी असतील,त्या तक्रारी शेतकऱ्यांनी दुकानाचे नाव, ठिकाण व तालुका, जिल्हा यांसह उपलब्ध असलेल्या पुराव्यासह वरील व्हाट्सप क्रमांकावर पाठवावेत. त्या प्रत्येक तक्रारीची तातडीने दखल घेऊन, त्याची शहानिशा करून त्यावर कारवाई केली जाईल, त्याचबरोबर तक्रार देणाऱ्या शेतकरी बंधू- भगिनींचे नाव पूर्णपणे गोपनीय ठेवले जाईल, अशी माहिती धनंजय मुंडे यांनी दिली आहे. मागील वर्षी देखील धनंजय मुंडे यांनी हा अभिनव उपक्रम राबविला होता. त्याद्वारे हजारो तक्रारींची सोडवणूक करण्यास मदत मिळाली होती. त्यामुळे याही वर्षी हा उपक्रम राबविण्याचा निर्णय धनंजय मुंडे यांनी घेतला असून, सदर व्हाट्सप क्रमांक कार्यान्वित करण्यात आला आहे.



## कविता

### आई

आई आसक्ती अखंड
काव्ये निर्मिती विपुल
आई वेगळीच जादू
जगी विश्वात सकल

आई निखळ,निस्वार्थी
प्रेम स्पर्शाचा तो ठेवा
आई असे देव्हाऱ्यात
नित्य जळणारा दिवा

आई हे वैकुंठ जिथे
देव वास्तव करती
ऋण फेडले कोणी
सांगा भूतलावरती.

आई सागर प्रेमाचा
तिथे माया पाझरती
हेच न्यायालय तिथे
सारे गुन्हे माफ होती

शाई पेनाची सरेल
किर्ती अमाप मायेची
पडतात शब्द कमी
गाता थोरवी आईची

आई वात्सल्य सावट
तीच मायेची शिदोरी
स्वामी तीनही जगाचा
आईविना तो भिकारी

कु.श्रद्धा सावंत.
सिंधुदुर्ग(कणकवली-मालवण)

# शाळेच्या पहिल्याच दिवशी शिक्षक समिती करणार काळ्या फिती लावून काम

**छ.संभाजीनगर/प्रतिनिधी**

१५जून२०२४रोजीमहाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती द्वारा राज्य व्यापी आंदोलन करणार.. जिल्हाध्यक्ष विजय साळकर दि.९ विद्यार्थी हिताच्या मागण्यांच्या अनुषंगाने तसेच १५ मार्च २०२४ रोजी निर्गमित करण्यात आलेला संच मान्यता संदर्भातील शासन निर्णय रद्द करण्यासाठी शिक्षक समिती संपूर्ण राज्यात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर १५ जून २०२४ रोजी एकदिवसीय धरणे आंदोलन करणार आहे. छत्रपती संभाजी नगर जिल्हातही काळ्या फिती लावून काम केले जाईल. असे जिल्हाध्यक्ष विजय साळकर व जिल्हा प्रसिध्दी प्रमुख सतिष कोळी यांनी कळविले आहे.यात प्रामुख्याने खालील मागण्यांचा समावेश असणार आहे.

राज्य शासनाने संचमान्यता आणि शिक्षक निर्धारण संबंधाने दिनांक १५ मार्च २०२४ रोजी निर्गत केलेल्या शासन निर्णयानुसार प्राथमिक शाळांमध्ये शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणावर कमी होणार आहेत तसेच सेवानिवृत्त शिक्षकांना कमी पटाच्या शाळेत मानधनावर नियुक्त करण्याचा निर्णय सुद्धा सर्वकष विचार न करता पूर्णतः चुकीचा आहे.त्याचप्रमाणे इयत्ता एक ते पाच,इयत्ता सहा ते आठ आणि मुख्याध्यापक पदाची नवनिर्धारण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनास अडसर निर्माण करणारे आहे.

शिक्षकांच्या गणवेश संहितेचा निर्णय सुद्धा शिक्षकांच्या स्वातंत्र्यावर गदा घाला घालणारा असून शिक्षकांच्या प्रति अविश्वास निर्माण करणारा आणि समाजामध्ये शिक्षकांप्रती नकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणारा आहे.

नवभारत साक्षरता कार्यक्रमाच्या जबाबदारीमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेकडे दुर्लक्ष होते दैनंदिन अध्यापनाचे कार्य प्रभावित होते हे मागील शैक्षणिक सत्रात सर्वांनी अनुभवले आहे. नवभारत साक्षरता कार्यक्रमासाठी १५ ते ३५ वयोगटातील प्रौढांचे सर्वेक्षण करणे, शिकवणे आणि परीक्षा घेणे याबाबतची शिक्षकांना जबाबदारी देणे सर्वथा अनाकलनिय आहे या कामांमध्ये शाळेत असणाऱ्या ६ ते १४ वर्षे वयोगटाच्या विद्यार्थ्यांच्या दैनंदिन अध्यापनावर विपरीत परिणाम होत असल्याने सदर काम शिक्षण हक्क कायद्याच्या तरतुदीस विसंगत आहे. गोरगरिबांचे शिक्षण संपवण्यासाठी शाळा एकत्रित करून समोर शाळा करण्याचा घाट शासनाने घातला आहे या विरोधात ड्रेस कोड विद्यार्थी व शिक्षक या नैसर्गिक शासन निर्णय नितीन व नवीन इतरही ज्वलंत समस्या पासून उभे आहेत

अशैक्षणिक कामासह शैक्षणिक गुणवत्तेच्या नावाखाली अनेक विविध उपक्रमांचा भडीमार विद्यार्थ्यांना तसेच शिक्षकांना त्रस्त करणारा आहे शिक्षकांना शिकवू द्या विद्यार्थ्यांना शिकू द्या या समाजभिमुख आणि विद्यार्थी हिताच्या मागणीसाठी शासनाकडे सतत मागणी करीत असूनही शासन व शासन यंत्रणा दुर्लक्ष करीत आहे पुढील शैक्षणिक सत्र सुरू होत असताना विद्यार्थी हिताच्या मागण्यांच्या सोडवणुकीसाठी शासनाने संघटना सह चर्चा करून आवश्यक धोरणात्मक बदल करावे. एक लढाऊ संघटना म्हणून महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती शासनाच्या या निर्णया विरोधात सकारात्मक विचारण्याकरिता शाळेच्या पहिल्या दिवशी याकडे लक्ष वेधण्यासाठी दिनांक १५ जून २०२४ रोजी संपूर्ण राज्यात धरणे ,निदर्शने आंदोलन करण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने राज्य कार्यकारणी सभेत घेतलेला आहे तरी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती शाखा छत्रपती संभाजीनगर च्या वतीने सुद्धा विद्यार्थी हिताच्या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी दिनांक १५ जून २०२४ शनिवार रोजी शाळेच्या पहिल्याच दिवशी काळ्या फिती लावून निषेध नोंदवून कामकाज केले जाणार आहे... आंदोलनात शेकडोच्या संख्येने शिक्षक बांधवांनी सहभागी होण्याचे आव्हान शिक्षक समिती जिल्हा शाखा छत्रपती संभाजीनगर तर्फे करण्यात आले आहे. आंदोलनाचे निवेदन दिनांक 7 जून २०२४ रोजी शिक्षक समिती पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून माननीय जिल्हाधिकारी साहेब यांना देण्यात आलेले आहे.

निवेदन देतेवेळी जिल्हाध्यक्ष विजय साळकर,सचिव रंजित राठोड,राज्य प्रवक्ते नितीन नवले, मराठवाडा अध्यक्ष शाम राजपूत,राजेंद्र ठाकूर,जिल्हा प्रसिध्दी प्रमुख सतीश कोळी,गुलाब चव्हाण,शालिराम खिस्ते,पंडित भोसले, बबन थोरे,विष्णू भंडारी, नामदेव चव्हाण,रऊफ पठाण,दिलीप रासने, लक्ष्मीकांत धाडबळे,कडूबा साळवे,के.डी.मगर,अशोक डोळस,कैलास ढेपले,प्रकाश जायभाये,दत्ताभाऊ खाडे,पंकज सोनवणे,जहांगीर देशमुख,बबन चव्हाण,दिलीप ढमाले,निंबा साळुंके,पंजाबराव देशमुख,विलास साळुंखे,विलास चव्हाण,भाऊसाहेब बोर्डे,टि. के. पुनवटकर, गजानन वरकड, पंडित भोसले, संजय भोसले, सुनील बडे, सिकंदर घोडके,अंकुश इथर,चंदू लोखंडे, एकनाथ पठाडे,अंकुश वाहूळ, दत्तात्रय थोरात, प्रविण गायकवाड,प्रविण उंडाळे, प्रकाश जायभाऐ, राजेंद्र वाघमारे,उर्दू जिल्हाध्यक्ष जावेद अन्सारी,फातिमा बाजी,पाशु शहा,गौस शेख,शहबाज मुन्नी,फजल सर, महिला जिल्हाध्यक्ष मंगला मदने,वर्षा देशमुख,दीपिका एरंडे,सुनिता चितळकर,अर्चना गोर्डे,वैशाली इंगळे,जयश्री राठोड,प्रीती जाधव,शीलाताई बहादुरे,शितल भडांगे,क्षिसागर मॅडम,कल्पना नाईक,प्रतिभा राणे, आदी उपस्थित होते.

# ज्ञानराधा मधील ठेवीदारांच्या मदतीला महिला सरसावल्या सर्वसाधारण ठेवीदाराच्या हिताचा निर्णय घेऊन पोलीस अधीक्षक साहेब यांनी सहकार्य करावे-डॉ. उषा सोनवणे

**प्रतिनिधी/बीड**

बीड जिल्ह्यातील आठ महिन्यापासून मल्टीस्टेट ज्ञानराधा, साईराम, जिजाऊ. या मोठ्या प्रमाणात संस्था डबघाईला आल्यानंतर जिल्ह्यात व महाराष्ट्रात एकच धुमाकूळ सुरू आहे अनेक ठेवीदारांचे या संस्थेत पैसे अडकल्यामुळे आज पूर्णपणे ठेवीदार हातबल झालेला असतानाच ज्ञानराधा मल्टी सर्विसेस चे चेअरमन सुरेश कुटे हे कुठेतरी वारंवार पैसे मिळणार अफवावर विश्वास ठेवू नका प्रत्येकाचा एकता एक रुपया दिला जाईल हे सांगत असताना व त्यांचे काम पूर्ण होत आहे असा संदेश येत असतानाच अचानक पणे सुरेश कुटे यांना अटक करण्यात आली आणि या अटके नंतर ठेवीदार हा सैरावैरा झाला प्रत्येक व्यक्ती हा पेनिक होऊन हातबल झाला आहे. की



त्यांच्या मनात आता आपला पैसा आपल्याला भेटणार नाही पुढल्या जाईल असा हातबल झाला जे की प्रशासन गेली कित्येक दिवसापासून सहकार्य करत असतानाच आज अचानक त्यांना अटक कशी झाली हीच चर्चा जिकडे तिकडे ऐकायला मिळत असतानाच बीड शहरातील धानोरा रोड शाखेतील महिलांनी एकजूट करून याच्याविरुद्ध आवाज उठविण्यासाठी व दोन्ही मधला दुवा बनण्यासाठी एक चांगली निर्णायक भूमिका घेऊन आज स्वतः त्या डॉ. उषा सोनवणे व डॉ.अनुजा लोढा यांच्या नेतृत्वाखाली एस पी साहेबांना भेटून गोरगरीब ठेवीदार असणाऱ्या सर्वसाधारण ठेवीदार असणाऱ्यांचा विचार करून यांच्या ठेवी कशा लवकरात लवकर मिळतील व सुरेश कुटे यांनी सहकार्य करून प्रशासनाच्या निगराणीत त्यांच्या फंड चे काम करून घेऊन गोरगरीब ठेवीदारांचा पैसा मिळण्यासाठीच प्रयत्न करणे त्यांच्यावर कायदेशीर कारवाई न करता पैसा कसा मिळेल याचाच प्रयत्न करावेत असे विनंती निवेदन महिला मंडळ व हजारो ठेवेदारांच्या उपस्थितीत हे निवेदन देण्यात आले आहे या निवेदनाची दखल आज प्रशासन कोणत्या प्रकारे घेते हेच पाहण्याची उत्सुकता आहे.

या निवेदनाची दखल नक्कीच चांगल्या प्रकारे घेतले जाईल आणि ठेवीदार या निवेदनामुळे पूर्णच पणे एका चांगल्या पॉझिटिव्ह मध्ये आलेला पाहायला मिळत आहे. हे निवेदन देता वेळेस डॉ.उषा सोनवणे, डॉ.अनुजा लोढा, शेंडगे मॅडम,वाघमारे मॅडम,ठोंबरे मॅडम, डाके मॅडम,पूजा डोळस मॅडम,सुनील सानप,राम सावंत,मस्के ,विजय,पवार, इत्यादी जणांची उपस्थिती होती

# आडूळ तांडा येथील घर फोडून साडेसात लाखांचा ऐवज लंपास पैठण तालुक्यातील घटना ; घरासमोरील वीजपुरवठा केला बंद

**छ.संभाजीनगर/प्रतिनिधी**

पैठण तालुक्यातील आडूळ तांड्यावरील एका घराच्या दरवाज्याचा कडीकोंडा तोडून अज्ञात चोरट्यांनी कपाटामधून रोख रकमेसह सोने- चांदीचे दागिने असा एकूण ७ लाख ५२ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना शनिवारी पहाटे घडली. पोलिसांच्या माहितीनुसार आडूळ तांडा येथील शेतकरी विजय अंबरसिंग राठोड हे कुटुंबीयांसह शुक्रवारी (दि.७) रात्री घरात झोपले होते. शनिवारी पहाटे चार वाजता अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घरासमोरील लाईटचे वायर तोडून अंधार करत घराच्या दरवाजाचा कडीकोंडा तोडून आतमध्ये प्रवेश केला. त्यानंतर कपाटातून रोख ३२ हजार व सोन्या-चांदीचे दागिने असा एकूण ७ लाख ५२ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. दरम्यान, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. भोरे यांच्यासह पोलिसांनी घटनास्थळाला भेट देत ठसे तज्ज्ञाला पाचारण करण्यात आले होते. या पथकाने दूरपर्यंत चोरट्यांचा माग काढला. परंतु त्यांचा सुगावा लागला नाही. त्यानंतर पोलिसांनी ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. आडूळमध्येही १० हजारांची घरफोडी तांड्या वरील राठोड यांच्यानंतर याच चोरट्यांनी शेतातील घरासमोरील लाईट बंद करून लोखंडी गेटचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर भिंतीवर लटकवलेल्या पर्समधील रोख १० रु लांबविल्याची घटना घडली आहे आठ दिवसांपूर्वीच गहाण ठेवलेले दागिने आणले होते सोडून---- विशेष म्हणजे मागच्या आठवड्यातच विजय अंबरसिंग राठोड यांनी एका व्यापाऱ्याकडे गहाण ठेवलेले सर्व सोन्या-चांदीचे दागिने पैसे जमा करून सोडून आणून घरात ठेवले होते. या दागिन्यांवर चोरट्यांनी डल्ला मारल्याने राठोड कुटुंबावर आर्थिक संकट कोसळले आहे. या घटनेचा तपास पोलिस करीत आहेत.

## उराशी बाळगलेले स्वप्न आता पूर्ण होईल', मोदींनी पंतप्रधानपदाची शपथ घेताच एकनाथ शिंदे यांची पहिली प्रतिक्रिया

भाजपचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी आज तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली. अठराव्या लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर विरोधी पक्षांच्या गोटात आनंदाचं वातावरण होतं. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू हे आपल्यासोबत येतील, असा विरोधातील इंडिया आघाडीचा दावा होता. पण नितीश कुमार आणि चंद्राबाबू नायडू यांनी आपण एनडीएसोबत कायम राहणार असल्याचं स्पष्ट केलं. त्यामुळे नरेंद्र मोदी यांचा तिसऱ्यांदा पंतप्रधान बनण्याचा मार्ग मोकळा झाला. नितीश कुमार यांनी शपथविधीचा कार्यक्रम लवकर पार पाडावा, अशी विनंती केली होती. त्यानंतर अखेर मोदी 3.0 सरकारचा शपथविधीचा कार्यक्रम आज पार पडला. नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'X' वर प्रतिक्रिया दिली. "बलसागर भारत होवो, विश्वात शोभुनी राहो! गेले दहा वर्षे व्रतस्थपणे देशाच्या कल्याणासाठी दिवसरात्र झटणारे, जागतिक पातळीवर भारताला मोठा सन्मान मिळवून देणारे आणि अहोरात्र गरिबांच्या कल्याणाचा ध्यास घेतलेले भारताचे भाग्यविधाते, विश्वगुरू नरेंद्र मोदी जी यांनी आज तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली. नवा भारत, श्रेष्ठ भारत घडवण्यासाठी त्यांच्या प्रयत्नात आम्ही भक्कम साथ देणार आहोत", असं आश्वासन एकनाथ शिंदे यांनी दिलं.

# शहर आयुक्तालय हद्दीत मनाई आदेश लागू

**नाशिकप्रतिनिधी**




नाशिक शहरातील कायदा व सुव्यवस्था बिघडू नये यासाठी पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी आठ ते २२ जून या दरम्यान महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार शहर आयुक्तालय हद्दीमध्ये मनाई आदेश लागू केले आहेत. येत्या १७ तारखेला बकरी ईद सण आहे .राज्यातील विविध राजकीय पक्षांमधील फूट व त्यामुळे होणारे आरोप - प्रत्यारोप त्याचप्रमाणे सामाजिक, राजकीय, वेगवेगळ्या प्रकरणे यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे तसेच मराठा , धनगर ,ओबीसी , आरक्षणासंदर्भात आंदोलने सुरू असल्यामुळे या साऱ्या पार्श्वभूमीवर शहरात शांतता कायम राहावी कायदा व सूव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू नये, यासाठी शहर पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी आठ ते २२ जुन दरम्यान पंधरा दिवसांसाठी शहरात मनाई आदेश लागू केले आहेत. त्यानुसार नागरिकांना कोणतेही दाहक किंवा स्फोटक पदार्थ सोबत नेता येणार नाही. दगड , शस्त्र , लाठ्या , बंदुका बाळगता येणार नाही . कोणत्याही व्यक्तीचे प्रतिकात्मक प्रेताचे किंवा प्रतिमेचे प्रदर्शन किंवा दहन करता येणार नाही. आरडा ओरड, वाद्य वाजवण्यास बंदी असेल. प्रक्षोभक भाषण ,वर्तनुकीस बंदी घालण्यात आली आहे . सार्वजनिक ठिकाणी महाआरती करणे, वाहनावर झेंडे लावून फिरणे ,पेढे वाटणे, फटाके फोडणे ,घंटानात करणे, शेरीबाजी करण्यासही बंदी घालण्यात आली आहे. पूर्वपरवानगीशिवाय पाच किंवा पाचपेक्षा जास्त नागरिकांना एकत्र जमण्यास, सभा घेण्यास किंवा मिरवणूक काढण्यास बंदी घालण्यात आली आहे. या आदेशाची उल्लंघन करणारे महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ कलम १३५ नुसार शिक्षेस पात्र राहतील. असा इशाराही आयुक्तांनी दिला आहे.

## बेलोरा गावाच्या रस्त्याची दुरावस्था.लोकप्रतिनिधीचे दुर्लक्ष..

भाजपचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी आज तिसऱ्यांदा मंत्रिपदाची शपथ घेत आहेत. नरेंद्र मोदी यांच्यासह देशभरातील एनडीएचे 69 खासदार मंत्रिपदाची शपथ घेत आहेत. नरेंद्र मोदी 3.0 सरकारमधील संभाव्य मंत्र्यांची यादी आमच्या हाती आली आहे. या यादीनुसार, उत्तर प्रदेशाला सर्वाधिक मंत्रिपदं देण्यात येत आहे. उत्तर प्रदेशातील 9 खासदारांना संभाव्य मंत्रिपदं देण्यात आली आहेत. त्यापाठोपाठ बिहारमधील 8 खासदारांना संभाव्य मंत्रिमंडळात स्थान देण्यात येत आहे. यानंतर महाराष्ट्राचा नंबर लागतोय.



महाराष्ट्रातील 6 खासदारांना संभाव्य मंत्रिपदाची जबाबदारी मिळत आहे. यामध्ये दोन खासदार हे तरुण खासदार आहेत. महाराष्ट्रानंतर गुजरातमधील 5 खासदारांना आज संभाव्य मंत्रिमंडळात स्थान दिलं जात आहे.

## स्वाराती रूग्णालयातील सिटीस्कॅन मशिनसह इतर यंत्रसामुग्री दुरूस्त करा ; रूग्णांना दर्जेदार आरोग्य सुविधा द्या संभाजी ब्रिगेडची निवेदनाद्वारे मागणी

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**



येथील स्वामी रामानंद तीर्थ शासकीय ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयात मागील अनेक दिवसांपासुन आरोग्य सेवेसाठी आवश्यक असलेल्या विविध मशिन व यंत्रसामुग्री बंद आहेत. त्यामुळे रूग्णांचे मोठे हाल होत आहेत. तरी शासन व प्रशासनाने याबाबत तातडीने पावले उचलावीत आणि स्वाराती रूग्णालयातील सिटीस्कॅन मशिनसह इतर यंत्रसामुग्री तात्काळ दुरूस्त करा, रूग्णांना दर्जेदार आरोग्य सुविधा द्या अशी मागणी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रविण उत्तमराव ठोंबरे यांच्या वतीने करण्यात आली आहे. या प्रश्नी त्यांनी स्वामी रामानंद तीर्थ शासकीय ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाचे अधिष्ठाता यांना नुकतेच निवेदन दिले आहे. रामानंद तीर्थ शासकीय ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाचे अधिष्ठाता यांच्याशी रूग्णसेवा संदर्भात चर्चा करून संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रविण उत्तमराव ठोंबरे यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, स्वामी रामानंद तीर्थ शासकीय ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, अंबाजोगाई मध्ये गेल्या अनेक दिवसांपासुन अनेक मशिन व यंत्रसामुग्री बंद आहेत. त्यामुळे रूग्णांचे बरेच हाल होत आहेत. त्यामुळे पुढील मागण्यांची पूर्तता व सोडवणूक करण्यात यावी. याबाबत आम्ही पक्षाच्या वतीने यापूर्वी २३ जानेवारी २०२४ रोजी निवेदन दिले आहे. तसेच २१ फेब्रुवारी २०२४ रोजी २ दिवसांचे आमरण उपोषण केले आहे. तरी परंतु, आजपावेतो या समस्यांची सोडवणूक करण्यात आलेली नाही. तरी आज ३ जुन रोजी आम्ही पुन्हा एकदा आपले या प्रश्नाकडे लक्ष वेधून घेत आहोत. तरी आपण जवळपास मागील ६ महिन्यांपासुन बंद असलेली सी.टी.स्कॅन मशीन तात्काळ सुरू करावी. रंगीत सोनोग्राफी व एम.आर.आय. मशिन चांगल्या पध्दतीने सुरू करण्यात याव्यात., अन्यथा आगामी काळात संभाजी ब्रिगेड पक्षाकडून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. सदरील निवेदनाच्या प्रती मा.एकनाथराव शिंदे, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई., उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई., मंत्री वैद्यकीय शिक्षण महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई., पालकमंत्री बीड, आमदार, खासदार, जिल्हाधिकारी, तहसीलदार यांना पाठवण्यात आल्या आहेत. सदरील निवेदनावर संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रविण उत्तमराव ठोंबरे, नारायण मुळे, तालुकाध्यक्ष रवींद्र ढगे, तालुका कार्याध्यक्ष गोविंद हाके, केशव टेहरे, अश्विनी यादव, सुनंदा लोखंडे, सिद्राम यादव, दत्तात्रय गंगणे, मुंजा बापू देवकते, पृथ्वीराज सोनवणे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. तर यावेळी मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष रामकिसन मस्के यांची विशेष उपस्थिती होती.

# अमरसिंह ढाका यांच्या वाढदिवसानिमित्त बीड शहरात विविध ठिकाणी वृक्षारोपण करून वाढदिवस साजरा

**प्रतिनिधी/बीड**

भारतीय बौद्ध महासभेचे बीड जिल्हा कोषाध्यक्ष अमरसिंह ढाका यांच्या वाढदिवसा निमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन तसेच , पूरग्रस्त कॉलनी,पोस्ट ऑफिस कार्यालय,व शहरातील विविध ठिकाणी वृक्षारोपण करून वाढदिवस साजरा करण्यात आला. पावसाळ्याचे दिवस आहेत झाडे लावा झाडे जगवा हा मूळ संदेश देण्यासाठी पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वाढदिवसा वर आधारित होनारा पण अना आवश्यक खर्च न करता तो खर्च वृक्ष लागवड करण्यात आला. आदर्श इतरांनाही घ्यावा असं मत अमरसिंग ढाका यांच्या वाढदिवसानिमित्त होत असलेल्या सत्कार ला उत्तर देताना सांगितलं, या वेळी अनेक मान्यवर मंडळीने मनोगत व्यक्त केले.

यावेळी विविध राजकीय सामाजिक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष महालिंग निकाळजे, वंचित बहुजन आघाडीचे नेते बबनराव वडमारे, प्रा. वसंत ओगले,डि.जी.वानखेड,अँड. हनुमंथ कांबळे, सदाशिव पटेकर, प्रा.बाळासाहेब गव्हाणे,अँड.रहुल साळवे,राजु महुवाले,ज्ञानेश्वर कवठेकर, संपादक बालाजी जगतकर,गणेश शिंदे,युनुस शेख, पुरुषोत्तम वीर,अजय सरवदे,अँड सत्यनारायण ढाका,अँड तेजस वडमारे,लखन जोगदंड, दत्तात्रेय सौंदरमल कार्यक्रमाचे आयोजन अँड.केतन गायकवाड,संदेश डोळस,गौतम कांबळे,संतोष जोगदंड,दिपक कांबळे,इंजि शरद वीर डॉ.गणेश खेमाडे, अंकूश चव्हाण, गणेश खोपे,अनिल डोळस, विनोद सवाई, या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अँड.केतन गायकवाड यांनी केले,या कार्यक्रमाला आप्त स्वकीय,मित्र मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बीड राज्य परिवहन महामंडळात कार्यरत असलेले वाहतूक नियंत्रक बबनराव वडमारे यांचा 31 तारखेला सेवनावृती झाली त्याबद्दल त्यांचा ही भारतीय बौद्ध महासभेच्या महालिगं निकाळजे व टिम च्या वतीने शाल,हार,पुष्पगुच्छ देऊन सत्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.प्रदीप वाघ उपसभापती, पंस मोखाडा

## माजी फुटबॉलपटू विनी जॉन्सचा चित्रपट बुलेटप्रुफ येतोय अल्ट्रा झकास मराठी ओटीटीवर

अनेकांनी विनी जॉन्सला फुटबॉलचे सामने खेळताना अनेकवेळा पाहिलं असेल. आता विनी जॉन्स १४ जून २०२४ रोजी अल्ट्रा झकास या मराठी ओटीटीवर प्रदर्शित होणाऱ्या 'बुलेटप्रूफ' या ॲक्शन-पॅक थ्रिलर चित्रपटात पहायला मिळणार. ड्रगच्या अड्ड्यातून लाखोची रोकड चोरून, चोर गाडी घेऊन पळून जातो. तेव्हा त्याला गाडीच्या डिकीत एक स्त्री दिसते. त्या स्त्रीचा नवरा चोराचा पाठलाग करतो. यांच्या धरपकडीत चित्रपटात काय काय घडणार आहे ते चित्रपट कळणार आहे. "थ्रिलर चित्रपट पाहत असताना प्रेक्षकांमध्ये नेहमीच एक वेगळा उत्साह असतो. याच उत्साहाला कायम ठेवत 'बुलेटप्रूफ' चित्रपट प्रेक्षकांसाठी जबरदस्त मनोरंजन बहाल करणार आहे." असे अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट प्रा. लिमिटेडचे सी.ई.ओ. श्री. सुशीलकुमार अग्रवाल म्हणाले.




## मंत्रिपदावरून विजय वडेट्टीवार यांचा अजित पवार गटाला टोला



एनडीए सरकारचा शपथविधी सोहळा सध्या होतोय. यात नरेंद्र मोदी यांच्यासह एनडीए सरकारमधील मंत्री शपथ घेत आहेत. मात्र यात राष्ट्रवादी अजित पवार गटातील नेत्यांचा समावेश नाहीये. अशातच विधानसभेचे विरोधी पक्षनेते, काँग्रेसचे वरिष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी मंत्रिपदावरून टोला लगवला आहे. भाजपचे नेहमीच धोरण आहे उपयोगी आहे तोपर्यंत उपभोगात आणायचं. निरुपयोगी झालं की काढून फेकायचं. आता राष्ट्रवादी अजित पवार गटाची हीच स्थिती आहे त्यांची उपयुक्तता संपली आहे. हे भाजपने ठरविलं आहे. उपयुक्तता संपली की डस्टबिनमध्ये जातात..., असं विजय वडेट्टीवार म्हणाले.

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
सोमवार १० जून २०२४


या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

# मनोज जरांगेंचं उपोषण सुरु, विधानसभेत पाडण्याचा इशारा

लोकसभेत कसा फटका बसला, हे जरांगेंनी सांगून सत्ताधाऱ्यांना इशारा दिला. जालन्यातून रावसाहेब दानवे आणि बीडमधून पंकजा मुंडे पराभूत झाल्या. या दोन्ही मतदारसंघात जरांगे फॅक्टरचा परिणाम स्पष्ट दिसला. 27 जानेवारीला नवी मुंबईत मुख्यमंत्री शिंदेंनी कुणबी जातप्रमाणपत्राबाबत सगेसोयऱ्यांच्या अधिसूचनेचं पत्र जरांगेंना दिलं. असंख्य मराठ्यांसह मुंबईच्या दिशेनं निघालेल्या जरांगेंनी आंदोलन स्थगित केलं.त्याचवेळी सरकारनं अधिसूचनेवर हरकती मागवल्या. त्यानंतर लोकसभेच्या आचारसंहितेत पुढची प्रक्रिया थांबली. आता जरांगे पुन्हा सगेसोयऱ्यांवरुन आक्रमक झालेत. सरकारनं जी अधिसूचना काढून मराठ्यांचा मोर्चा मुंबईकडे येण्यापासून थांबवला. त्यात सगेसोयऱ्यांची व्याख्या





नेमकी काय आहे. सगेसोयरे म्हणजे अर्जदाराचे वडील, आजोबा, पंजोबा व त्यापूर्वीच्या पिढ्यांमध्ये जातीमधील झालेल्या लग्न नातेसंबंधातून निर्माण झालेले नातेवाईक. रक्तातील नातेवाईक, पितृसत्ताक पद्धतीतील सगेसोयरे आहेत असं शपथपत्र पुरावा म्हणून अर्जदारानं दिल्यास गृहचौकशीद्वारे कुणबी जातप्रमाणपत्र देण्यात येईल. ज्या मराठा व्यक्तींची कुणबी नोंद सापडली आहे त्याआधारे गणगोतातील सर्व सग्यासोयऱ्यांना कुणबी जातप्रमाणपत्र देण्यात येईल. सरसकट मराठ्यांना कुणबी जातप्रमाणपत्र द्या अशी मागणी आधी जरांगेंची होती. त्यानंतर सगेसोयऱ्यांच्या व्याख्येवरुन मध्यम मार्ग निघाला. पण आता अधिसूनचा कायद्यात बदलून कुणबी जातप्रमाणं वाटप सुरु करणार यासाठी जरांगेंनी पुन्हा उपोषणाचं हत्यार उपसलंय. फडणवीस साहेब तुम्ही भ्रमात राहू नका जे घडलेले आहे ते मान्य करा. मराठ्यांच्या पोरांना आरक्षणाचा फायदा करून द्या आम्हाला आरक्षण द्या, गुन्हे मागे घ्या, मला राजकारणात जायचं नाही, आम्हाला आरक्षण द्या, जर तुम्ही मागण्या पूर्ण केल्या तर मराठे तुम्हाला डोक्यावर घेऊन नाचतील. तुम्ही जर आरक्षण दिलं नाही तर तुम्हाला एकालाही निवडून येऊ देणार नाही, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.

## माझा जातीपातीच्या राजकारणाचा बळी, बिनकामाचा माणुस निवडून देत लोकशाहीची चेष्टा आणि थट्टा

"लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यावर महायुतीला मोठा धक्का बसल्याचं दिसून आलं. काही जागांवर तिकीट न मिळाल्यामुळे नाराज असलेल्या उमेदवारांनी पक्ष बदलला पण तरीही यश मिळालं नाही. अशाच प्रकारे शिरूर मतदारसंघातही माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांचा यंदाही शरद पवार गटाच्या अमोल कोल्हे यांनी पराभव केला. लोकसभा निवडणुकीमध्ये झालेल्या पराभवाबाबत बोलताना माझा जातीपातीच्या राजकारणाचा बळी गेल्याचं शिवाजीराव आढळराव पाटील यांनी म्हटलं आहे या निवडणुकीत विकासकामांना प्रधान्य न देता कामाचा माणुस आणि बिनकामाचा अशी लढत झाली. यामध्ये जातीपातीच्या राजकारणाची खेळी खेळली गेली त्यातच पराभव झाल्याचा खंत शिवाजी आढळरावपाटीलांनी व्यक्त केली. परावभवानंतरही न थांबता माझ्यावर विश्वास टाकणाऱ्या जनतेसाठी काम करत रहाणार असल्याचे आढळरावपाटीलांनी जाहीरपणे सांगितलं. 2008 मध्ये शिरूर लोकसभा मतदारसंघ निर्माण करण्यात आला. या मतदारसंघात सहा विधानसभेचे मतदारसंघ येतात. जुन्नर, आंबेगाव, खेड आळंदी, शिरूर, भोसरी, हडपसर हे विधानसभा मतदारसंघ आहेत. शिवसेनेमध्ये असलेल्या शिवाजीराव आढळराव पाटील 2009 आणि 2014 मध्ये निवडून आले होते

# सुप्रसिद्ध पार्श्वगायिका पद्मश्री अनुराधा पौडवाल यांच्या हस्ते स्व. अरुण पौडवाल कृतज्ञता गौरव पुरस्कार गायक-संगीतकार त्यागराज खाडिलकर यांना प्रदान!

**सांस्कृतिक प्रतिनिधी, (मुंबई)** : सुप्रसिद्ध अकॉर्डियन वादक, कुशल संगीत संयोजक आणि प्रतिभाशाली संगीतकार अरुण पौडवाल यांच्या स्मृती जपणारा आणि कुठलाही बडेजावपणा न आणता अत्यंत साधेपणाने घरगुती मंगलमय वातावरणात गेली २७ वर्षे साजरा होणारा 'स्व. अरुण पौडवाल यांच्या स्मृति प्रित्यर्थ देण्यात येणारा "कृतज्ञता गौरव पुरस्कार" नुकताच प्रसिद्ध गायक संगीतकार त्यागराज खाडिलकर यांना सुप्रसिद्ध पार्श्वगायिका पद्मश्री अनुराधाजी पौडवाल यांच्या हस्ते आणि कवीता पौडवाल-तुळपुळे व पौडवाल कुटुंबियांच्या उपस्थितीत, त्यांच्या खार येथील निवास्थानी प्रदान करण्यात आला. ५१ हजार रोख रुपये आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या गौरव सन्मानाची संकल्पना विशद करताना सुप्रसिद्ध पार्श्वगायिका पद्मश्री अनुराधा पौडवाल म्हणाल्या, "अरुणजी हे स्वतः एक अतिशय उच्चकोटीचे संगीतकार - म्युझिशियन होते. त्यामुळे कलाकारांचा योग्य तो सन्मान व्हायला पाहिजे. बहुतेकवेळा त्यांचे फॅन्स काही सत्कार सोहळे करीत असतात. पण आर्टिस्टने एका आर्टिस्टचा सन्मान करणे याला जास्त महत्व आहे. आजचा हा २७ वा सोहळा आहे. याच्या आधी ज्या ज्या कलाकारांनी अरुणजींसोबत काम केले आहे, ज्यांना त्यांच्या कामाची पद्धत, त्यांचा स्वभाव माहित आहे अश्या कलावंतांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. यावेळी त्यागराज यांची निवड करण्यामागे विशेष कारण आहे. काही महिन्यापूर्वी मी त्यांच्या एका कार्यक्रमासाठी विशेष प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांनी दिव्यांग मुलांना घेऊन एक अल्बम केला होता. अश्या मुलांसोबत केलेला हा जगातील एकमेव असा सुंदर अल्बम आहे, असं मला वाटतंय. इतकं सुंदर संगीत आणि संयोजन करून त्यांनी पूर्ण न्याय दिला आहे. दुसऱ्या आर्टिस्टला पुढे आणावं ही गोष्ट, हि कल्पना फार महत्वाची आहे. त्यांच्यातील ही गोष्ट मनाला भिडली आणि म्हणूनच त्यांची या पुरस्कारासाठी निवड केली." या प्रसंगी आपल्या भावना व्यक्त करताना गायक संगीतकार त्यागराज खाडिलकर म्हणाले, "माझ्यासाठी हा अत्यंत महत्वाचा पुरस्कार आहे. गेल्या २६ वर्षातील पुरस्कार्थींची यादी पाहिल्यावर खरंतर मी थरारून गेलो. अरुणजींच्या नावाचा हा पुरस्कार मिळविणाऱ्यांच्या या मांदियाळीमध्ये माझीही नोंद झाली हे माझ्यासाठी खूप महत्त्वाचं आहे. अरुणजींच्या संगीताचे आणि संगीतसंयोजनाचे अनेक संस्कार माझ्यावर झाले आहेत. माझ्या गाण्यांतून ते आपल्याला पदोपदी जाणवतात सुद्धा. या प्रतिभावान संगीतकाराची गाणी आजही तितक्याच लोकप्रियतेने गायली जातात. त्यांच्या नावाचा पुरस्कार लाभावा आणि तोही साक्षात पद्मश्री अनुराधाताई यांच्या हस्ते ही माझ्यासाठी विशेष भाग्याची आणि प्रेरणादाई गोष्ट आहे. हा सोहळा अनुराधा पौडवाल यांच्या निवास्थानी स्थित दक्षिणेश्वरी काली माता मंदिरात संपन्न झाला. याच वेळी 'स्वरकुल ट्रस्ट'तर्फे सादर झालेल्या "तिमीरातुनी तेजाकडे" या भारतातील पहिल्या दिव्यांग कलाकारांनी गायलेल्या अल्बम मधील अतुल कसबे आणि विजयालक्ष्मी यादव या दोन दिव्यांग गायकांना देखील अनुराधाजींच्या हस्ते सन्मानित करण्यात आले! या अंध गायकांनी गायलेल्या महाराष्ट्रातील नवोदित गीतकरांच्या त्यागराजजींनी स्वरबद्ध केलेल्या रचनांना उपस्थितांचा भरभरून प्रतिसाद दिली! याप्रसंगी त्यागराजजींनी दिव्यांग गायकांच्या हिंदी अलबमची, तसेच अनुराधा पौडवाल यांच्यासोबत 'भजनगंगा' या हिंदी कार्यक्रमाची योजना जाहीर केली. या कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन स्व. अरुण पौडवाल यांचे निस्सीम चाहते आणि जाणकार संगीतदर्दी प्रसिद्ध गायक श्री चंद्रशेखर महामुनी यांनी केले.

# तनया येरमवार हिचे नीट परीक्षेत ७२० पैकी ६५० मार्क मिळवून घवघवीत यश

**प्रतिनिधी/लोहा**

लोहा शहरातील विद्यार्थीनी तनया येरमवार हिने वैद्यकीय प्रवेश पूर्व पात्र नीट परीक्षेत ७२० पैकी ६५० गुण मिळवून यश संपादन केले अणि एम. बी. बी. स साठी पात्र ठरली आहे. तिच्या या यशाबद्दल आई पूजा येरमवार, वडील उमाकांत




येरमवार लोहा नगरपालिकेचे मा. नगराध्यक्ष किरण सावकार वट्टमवार, विठलेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष केरबा सावकार बिडवई तसेच आर्य वैश्य समाजाचे अध्यक्ष दिनेश सावकार तेललवार, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष नामदेव सावकार कटकमवार , सूर्यकांत पालीमकर आर्य वैश्य महासभा सदस्य प्रशांत सावकार पातेवार, राहुल कोटलवार व आर्य वैश्य समाजातील सर्व समाज बांधवानी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## ...म्हणून श्रीकांत शिंदे यांनी मंत्रिपद नाकारलं?; शपथविधीनंतर तर्कांना उधाण

नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली असून शपथविधीचा कार्यक्रम राष्ट्रपती भवनामध्ये सुरू आहे. महाराष्ट्राच्या वाट्याला दोन कॅबिनेट तर चार राज्यमंत्रीपद आली आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यमंत्रीपद नाकारलं असून आम्ही थांबावला तयार असल्याचं म्हटलं आहे. शपथविधी होण्याआधी मुख्यमंत्र्यांचे सुपुत्र एकनाथ शिंदे यांचे सुपुत्र खासदार श्रीकांत शिंदे यांनी आधी आपल्याला मंत्रीपद नको असल्याचं म्हटलं होतं. मात्र शिंदे गटाला एकही कॅबिनेटपद मिळालं नाही. त्यामुळे शपथविधीनंतर राज्यात तर्कवितर्कांना उधाण आलं आहे महाराष्ट्रामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे जवळचे मानले जाणारे पीयूष गोयल आणि माजी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांना कॅबिनेटपद मिळालं आहे. तर एकनाख शिंदे यांच्या शिवसेनेमधील प्रतापराव जाधव यांना राज्यमंत्रिपद मिळालं आहे. तर भाजपच्या रक्षा खडसे आणि मुरलीधर मोहोळ यांना राज्यमंत्रिपद मिळालं असून आरपीआय नेते आणि माजी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांना राज्यमंत्रिपद मिळालं आहे.



# बीडमधील पराभव जिव्हारी लागल्याने तरूणाने जीवन संपवलं?; पंकजा म्हणाल्या, तुम्हाला मुंडेसाहेबांची शपथः

नेता म्हणजे कार्यकर्त्याचा जीव असतो... नेत्याचा जय- पराजय कार्यकर्त्याच्या जिव्हारी लागतो. एखाद्या निवडणुकीत पराभव झाला तर नेत्या इतकंच त्याचा कार्यकर्ताही दुखावला जातो. अशावेळी खचलेल्या कार्यकर्त्याचं मनोबल वाढवलं गेलं नाही तर विपरित घटनांनाही सामोरं जावं लागू शकतं. अशीच घटना बीडमध्ये घडली आहे. भाजप नेत्या पंकजा मुंडे यांच्या पराभवांनंतर त्यांच्या समर्थकांमध्ये प्रचंड नाराजी पसरलेली आहे. पंकजा मुंडे यांच्या कार्यकर्त्याने पराभवामुळे तरूणाने जीवन संपवल्याचं समोर आलं आहे. यामुळे बीड परिसरात शोककळा पसरली आहे. पंकजा मुंडे यांनी देखील आपल्या कार्यकर्यांना महत्वाचं आवाहन केलं आहे. पंकजा मुंडे यांचा पराभव जिव्हारी लागल्याने तरूणाने जीवन संपवलं असल्याची चर्चा होतेय. लातूरमधील सचिन मुंडे या तरूणाने जीवन संपवलं. तरूणाने जीवन संपवल्याने परिसरात शोककळा परसरली आहे. पंकजा मुंडेंच्या पराभवाने सचिन खचला आणि त्याने जीवन संपवल्याचा दावा या तरूणाच्या कुटुंबाने हा दावा केला आहे. लातूर जिल्ह्यातील येस्तार गावातील ही घटना आहे. लातूरमधली ही घटना समजताच पंकजा मुंडे यांनी ट्विट करत कार्यकर्त्यांना आवाहन केलं आहे. माझ्यासाठी मरण्यापेक्षा आपल्या उद्देशासाठी जगा... संयम ठेवा, असं आवाहन पंकजा मुंडे यांनी केलं आहे. 15 जूनपासून आभार दौरा करणार असल्याचंही पंकजा मुंडेंनी सांगितलं आहे. याबाबत त्यांनी एक ट्विट केलं आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com